# डायल- ११२ क्रमांकावर आलेल्या माहीतीनुसार जिल्हा नागपूर ग्रामीण अंतर्गत पो स्टे उमरेड हद्दीत पुराचे पाण्यात वाहनासह अडकलेले १० जणांचे जीव वाचवण्यात उमरेड पोलीसांना यश





दिनांक १८/०७/२०२२ रोजी पहाटे चे २/१५ वा. दरम्यान अब्दुल नईम अब्दुल हनिफ रा. हिंगणघाट,जिल्हा वर्धा हे त्यांचा परिवारातील ४ महिला, ५ पुरूष व १ बालक असे १० नागरिकांचे चारचाकी वाहन इंडिगो क्र.एम.एच.३१ सी.एच.७५५२ आणी स्विफ्ट कार क्र.एम.एच-३४ के ६५४० या दोन वाहनाने ब्रम्हपुरी येथुन उमरेड गिरड मार्गे हिंगणघाट येथे जात असताना मौजा- बेसुर गावाजवळील चिखलापार नदीचे पुरात वाहनांसह अडकले होते, त्यांनी डॉयल ११२ वर कॉल देवून मदत मिळण्याबाबत माहीती दिली असता DCR नागपूर ग्रामीण येथे कर्तव्यावर सतर्क असलेले अंमलदार व सुपरवायजर यांनी विलंब न करता सदर कॉल हा पो.स्टे. उमरेड येथे दिला, पो.स्टे. उमरेड येथील रात्र ड्युटी अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच भिवापूर येथील डिव्हीजन गस्त अधिकारी व अंमलदार हे पाऊस सुरू असताना तात्काळ घटनास्थळी पोहोचले असता वरील १० लोक हे चिखलापार नदी व त्याचा बाजुला असलेल्या नाल्याचा मधोमध पुराच्या पाण्याने वेढल्याचे दिसुन आले, सततधार पाऊस, खाली पुराच्या पाण्याचा वाहनारा जोरदार प्रवाह अश्या अत्यंत भयंकर व जिवघेण्या परिस्थितीत जिवा ची पर्वा न करता घटनेचे गांभिर्य लक्षात जाणुन प्रसंगावधानाने बेसुर गावातील स्थानीक लोकांच्या सहकार्याने तब्बल दोन तास रेस्क्यु ऑपरेशन राबवीत पाण्यात मोठा दोर टाकुन व मानवी साखळी च्या सहाय्याने पहाटे ४/३० वा. सुमारास पुरात अडकलेल्या १० नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले व शासकीय विश्रामगृह, उमरेड येथे आणुन तात्पुरती राहण्याची व्यवस्था केली.

वरील कामगिरी श्री. विजयकुमार मगर,पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री.राहुल माकणीकर, अप्पर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण,श्री. भिमराव टेळे, उपविभागिय पोलीस अधिकारी उमरेड,श्री.प्रमोद घोंगे,पोलीस निरीक्षक,पोलीस ठाणे उमरेड यांचे मार्गदर्शनाखाली ईश्वर जोधे,पोलीस उपनिरीक्षक,पो.ना./नितेश राठोड,पोना/राहुल धोंडे,पोशि/पंकज बट्टे,पो.शि./सुहास बावनकर, चालक पो.शि./उमेश बांते आणी पो.स्टे.भिवापूर येथील शरद भस्मे,सहायक पोलीस निरीक्षक, चालक पो.हवा./रविंन्द्र लेंडे,पो.ना./दिपक जाधव तसेच मौजा-बेसुर गावातील नागरिक जितेंद्र दौलतराव धोटे,विशाल वामन चौधरी, निरंजन तुळशीराम डंबारे,अंकित अशोक कुबडे,खोंडेश्वर रामभाऊ शिंगाडे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.